महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, २०१२
व्यायामशाळा विकास अनुदान योजनेत सुधारणा.

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः क्रीडाधो-३११३/प्र.क्र.३९/क्रीयुसे-३,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २२ जानेवारी, २०१४.

**वाचा -**

१. शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक- राक्रीधो-१०९६/प्र.क्र.३३०/क्रीयुसे-१, दिनांक ३१ जुलै,१९९७,
२. शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-राक्रीधो-२००३/प्र.क्र.११/क्रीयुसे-१, दिनांक २६ मार्च,२००३,
३. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-क्रीडाधो-२०११/ प्र.क्र.५५/११/क्रीयुसे-१, दिनांक १४ जून,२०१२.

**प्रस्तावना -**

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून राज्याचे क्रीडा धोरण,२०१२ घोषित करण्यात आले असून, त्याची अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक १४.६.२०१२ चा शासन निर्णय निर्गमित झाला आहे. या क्रीडा धोरणातील मुद्दा क्रमांक-४.७ (ब) हा व्यायामशाळा विकास अनुदान योजनेत सुधारणा करण्याबाबत आहे. त्यानुसार व्यायामशाळा बांधकाम व व्यायाम साहित्य देण्याच्या जिल्हास्तरीय योजनेची अनुदान मर्यादा वाढवून निकषात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

या शासन निर्णयाद्वारे व्यायामशाळा बांधकाम व व्यायाम साहित्य देण्याच्या जिल्हास्तरीय योजनेची अनुदान मर्यादा रु.२.०० लाखावरुन रु.७.०० लाख अशी सुधारित करण्याचा तसेच याबाबत सुधारित नियमावली लागू करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. या योजनेचा दिनांक ३१.७.१९९७ व दिनांक २६.३.२००३ चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत.

३. या योजनेचा लाभ देण्यासाठी शासन निर्णयासोबतची परिशिष्ट-"अ" मधील नियमावली लागू राहील. सुधारित अनुदान मर्यादा व नियमावली शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू होईल. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थींनी करावयाचा विहीत नमुन्यातील अर्ज आयुक्त / संचालक, क्रीडा व युवक सेवा, यांनी त्यांच्या अधिकृत संकेतस्थळ sports.maharashtra.gov.in तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावा.

४. या जिल्हास्तरीय योजनेकरिता संबंधित जिल्ह्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत व्यायामशाळांचा विकास या जिल्हास्तरीय योजनेचे जे लेखाशिर्ष उपलब्ध आहे. तेच या योजनेसाठी पुढे सुरु राहील.

या योजनेत पारदर्शकता राहण्यासाठी प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी तपासून संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांची तांत्रिक मान्यता घ्यावी व पात्र संस्थांची निवड, निकष प्राथम्य क्रमाने संस्थांची यादी तयार करण्यात यावी त्यानुसार पात्र संस्थांना अंतिम प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

५. सदरहू शासन निर्णय नियोजन विभागाच्या संमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-२०९/व्यय-५, दिनांक २.३.२०१३ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०१२२१७५२४५४१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajshekhar Chandrakant Patil

Digitally signed by Rajshekhar Chandrakant Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajshekhar Chandrakant Patil
Date: 2014.01.22 17:52:38 +05'30'

**( रा. चं. पाटील)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
२. मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. मा. मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, संचालनालय यांना या शासन निर्णयाची व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह.
५. आयुक्त/संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे,
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
७. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
८. नियोजन विभाग (का.१४७१ व १४८१), मंत्रालय, मुंबई,
९. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,
१०. सर्व जिल्हाधिकारी,

११. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी यांना संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत,
१२. सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत),
१३. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत),
१४. ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई,
१५. मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१६. मा.राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१७. निवड नस्ती (क्रीयुसे-१, क्रीयुसे-२ व क्रीयुसे-३).

शासन निर्णय क्रमांक : क्रीडाधो-३११३/प्र.क्र.३९/क्रीयुसे-३, दिनांक : २२ जानेवारी, २०१४ चे सहपत्र

## परिशिष्ट - अ

## व्यायामशाळा विकास अनुदान योजना बाबतची नियमावली

**नियम क्र.१** या नियमावलीस व्यायामशाळा बांधकाम व आधुनिक व्यायाम साहित्य यासाठी अनुदान मंजूर करणे असे संबोधण्यात येईल.

सदर नियमावली नियम शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

**नियम क्र.२ अनुदानासाठी पात्र संस्था :-**

अनुदानासाठी पात्र संस्था साठी प्राथम्यक्रम खालील प्रमाणे राहील.

१. स्थानिक स्वराज्य संस्था ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद
२. आदिवासी विकास व सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणा-या सर्व शासकीय प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा/ आश्रमशाळा व वसतिगृह.
३. क्रीडा विभागाच्या विविध समित्या तसेच पोलीस कल्याण निधी / पोलीस विभाग, स्पोर्टस क्लब, ऑफिसर्स क्लब हे अनुदानासाठी पात्र राहतील.
४. खाजगी शैक्षणिक संस्थेद्वारे चालविण्यात येणा-या प्राथमिक, माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये ज्यांना शिक्षण विभागाने मान्यता दिली आहे अशा संस्था. तसेच विविध खेळाच्या विकासासाठी कार्यरत असणा-या सार्वजनीक विश्वस्त अधिनियम, १९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये पंजीबध्द असतील अशा संस्था, क्रीडा मंडळे, युवक मंडळे व महिला मंडळे.

**नियम क्र.३ अनुदानाच्या बाबी :-**

१. किमान ५०० चौ.फूट चटई क्षेत्राचे स्वतंत्र व्यायामगृह बांधकाम करणे, याशिवाय बांधकामामध्ये कार्यालय/भांडारगृह, प्रसाधनगृह इ.बाबींचा समावेश असावा.
२. व्यायामशाळा नुतनीकरण व दुरुस्ती करणे.
३. जुन्या नियमानुसार बांधकाम पुर्ण झालेल्या व्यायामशाळा व वर उल्लेखीत क्षेत्रफळाच्या नवीन व्यायामशाळांना अत्याधुनिक व्यायामसाहित्याचा पुरवठा करणे

**नियम क्र. ४ अनुदान मंजूरीच्या अटी :-**

१. संस्थेकडे स्वत:च्या मालकीची किंवा दीर्घ मुदतीच्या करारावर (किमान ३० वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक) व्यायामशाळा बांधकामासाठी जागा असणे आवश्यक आहे.
२. ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद, शासनाच्या विविध विभागामार्फत दाखल करण्यात येणा-या प्रस्तावासोबत अंदाजपत्रक, आराखडे, जागेच्या मालकी हक्काची कागदपत्रे व इतर हमी पत्रे इ. सादर करणे आवश्यक राहील तसेच वर उल्लेखीत सर्व यंत्रणा १०० टक्के अनुदानास पात्र राहतील.
३. बांधकामास ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका यांची परवानगी असल्याचे प्रमाणपत्र तसेच संबंधित बाबींचे खर्चाचे अंदाजपत्रक व आराखडे नोंदणीकृत अभियंता/नोंदणीकृत वास्तुशिल्पतज्ञ (आर्किटेक्ट) यांनी मान्य केलेले असावे.

४. व्यायामशाळेचा वापर इतर कोणत्याही कारणासाठी करता येणार नाही. तसेच व्यायामशाळेचा उपयोग कोणत्याही राजकीय कार्यक्रमाकरिता करण्यात येऊ नये.
५. व्यायामशाळेच्या भविष्यातील देखभालीवरील सर्व खर्च संबंधित संस्थेस करावा लागेल.
६. शासकीय कार्यक्रमाकरिता सदरची व्यायामशाळा विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल.
७. संस्थेने स्वत:चा हिस्सा म्हणून अनुदानाच्या २५ टक्के रक्कम प्रथम खर्च करणे आवश्यक राहील.
८. व्यायामशाळा बांधकामासाठी मंजूर अनुदानाव्यतिरिक्त अंदाजपत्रक व आराखडयानुसार संस्थेच्या हिश्याशिवाय जास्तीचा करावा लागणारा बांधकामावरील खर्च संबंधित संस्थेस करावा लागेल.
९. अनुदान मंजुरीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह विहीत मुदतीत संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील. अर्ज सादर केल्यानंतर प्रथमत: जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी प्रस्तावाची छाननी करुन संबंधित जागेला भेट देऊन खात्री केल्यानंतर परिपूर्ण प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात यावी. त्यानंतरच संस्थेने आपल्या हिश्श्याची अंदाजपत्रकाच्या २५ टक्के रक्कम बांधकाम बाबीवर प्रथम खर्च करुन खर्चाचे सनदी लेखापाल यांचे स्वाक्षरीचे विवरणपत्र तसेच बांधकाम प्रगती अहवाल, बांधकामाच्या प्रगतीचे फोटो इ. तीन महिन्याच्या आत जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा सदर संस्थेस अनुदान वितरित करण्यास जिल्हा क्रीडा अधिकारी जबाबदार राहणार नाही, याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. सदर संस्थेचा अहवाल व बांधकाम प्रगती याची जिल्हा क्रीडा अधिकारी वा त्यांचे प्रतिनिधी यांनी शहानिशा करावी.
१०. प्रगती अहवालाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन अंदाजीत खर्चाच्या २५ टक्के रक्कमेइतके संस्थेने बांधकाम केल्याची खात्री करुन अनुदान वितरणाची कार्यवाही संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी करावी.
११. सदर योजनेतंर्गत देण्यात येणारे अनुदान हे शक्यतो एकाच हप्त्यामध्ये निधीच्या उपलब्धतेनुसार वितरित करण्यात येईल.
१२. व्यायामसाहित्यासाठी प्रस्ताव दाखल करताना प्रस्तावाबरोबर आवश्यक त्या व्यायाम साहित्याची यादी सादर करणे आवश्यक राहील. त्याकरिता संस्थेने प्रस्तावाबरोबर संस्थेचा अनुज्ञेय हिस्सा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडे भरण्याबाबत तयार असल्याबाबतचे हमीपत्र जोडणे आवश्यक आहे. प्रस्तावाला प्रथम तत्वत: मान्यता देण्यात येऊन २५ टक्के अनुज्ञेय हिस्सा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडे धनाकर्षाच्या स्वरुपात जमा केल्यानंतर सदरचे व्यायाम साहित्य हे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत पुरविण्यात येईल.
१३. प्रत्येक दोन वर्षाने क्रीडा व युवकसेवा संचालनालय पुणे यांनी व्यायाम साहित्याचे दरपत्रक व पुरवठादार यांची विभागनिहाय व संपूर्ण राज्यासाठी अधिकृत यादी जाहीर करावी. सदर पुरवठादारांपैकी एका पुरवठादाराकडून आवश्यक व्यायाम साहित्याचे कोटेशन लाभार्थी संस्थेने सादर करावे. आवश्यक व्यायाम साहित्याची निश्चिती करण्याचा अधिकार लाभार्थी संस्थेस राहील.

१४. पात्र लाभार्थीकडून २५ टक्के अनुज्ञेय हिस्सा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडे जमा झाल्यानंतर (स्वहिस्सा अनुज्ञेय नसणाया- लाभार्थीकडून कोटेशन प्राप्त झाल्यावर( संबंधित पुरवठादाराकडून व्यायाम साहित्याचा पुरवठा लाभार्थी संस्थेस जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या निर्देशानुसार करण्यात येईल. साहित्य पुरवठ्यासाठीचा प्रवास खर्च व इतर कर यांचा आर्थिक भार लाभार्थी संस्थेने सोसावा लागेल.

१५. लाभार्थी संस्थेच्या व्यायामशाळेत प्रत्यक्ष व्यायाम साहित्य उभारणी झाल्यानंतर त्याची छायाचित्रे (लाभार्थी संस्थेद्वारा साक्षांकित( व साहित्य प्राप्तीचे प्रमाणपत्र संस्था देईल. त्यानंतर आवश्यक निधी वितरण जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून थेटपणे पुरवठादारास करण्यात येईल.

१६. व्यायाम साहित्य खरेदीसाठी संस्था अनुदानित वर्षापासून दर पाच वर्षानंतर अनुदानास पात्र राहील. मात्र व्यायामशाळा बांधकामासाठी संस्थेला एकदाच लाभ घेता येईल.

१७. संबंधित अर्जदार संस्थेस प्रस्तावासोबत सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे ही संस्थेशी संबंधित व खरी असल्याबाबत तसेच प्रकल्प पूर्ण करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु.१००/- च्या कोर्ट फी स्टॅम्पवर सादर करणे आवश्यक राहील.

१८. मंजूर अनुदानाचा मुदतीत खर्च न झाल्यास अथवा मंजूर अनुदानाचा दुरुपयोग झाल्याबाबत शासनाच्या/कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास सदरचे मंजूर अनुदान मंजूरीच्या तारखेपासून दंडनीय व्याजासह आर.आर.सी. अंतर्गत वसूल करण्यात येईल.

१९. प्रस्तावासोबत चुकीची अथवा खोटी माहिती अथवा कागदपत्रे सादर केल्यास संस्थेच्या सर्व पदाधिका-यावर फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्यात येईल.

२०. मंजूर अनुदानाचा विनियोग अंदाजपत्रक आराखडयानुसार अनुदान प्राप्त झाल्यापासून दोन वर्षाच्या आत करुन मंजूर अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र, लेखा विवरणपत्र, प्रकल्प पूर्णत्वाचा दाखला, बांधकाम पूर्ण झाल्याबाबतचे छायाचित्रे सक्षम यंत्रणेच्या स्वाक्षरीच्या दाखल्यासह द्विप्रतीत सादर करणे जिल्हा क्रीडा अधिकारी यांना सादर करणे आवश्यक राहील.

## नियम क्र. ५ दुरुस्ती व नुतनीकरणाच्या अटी :-

१. बांधकाम किमान २० वर्षे जुने असावे तसेच दुरुस्तीपूर्वी किमान १३ वर्षे सतत वापर असावा.

२. दुरुस्ती व नुतनीकरणाची खात्री जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी करावी.

३. व्यायामशाळेचे नुतनीकरण अथवा दुरुस्ती बांधकाम नियमानुसार नसल्यास अनुदान देय ठरणार नाही.

## नियम क्र. ६ अनुदानाचा दर व मर्यादा :-

(अ) नियम क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या बांधकामाच्या बाबीकरिता अंदाजीत खर्चाच्या शासन अनुदान ७५ टक्के व संस्थेचा हिस्सा २५ टक्के राहील अनुदान मंजूर करताना अंदाजपत्रकाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त रू.७.०० लाख यापैकी कमी असेल इतकी रक्कम प्राप्त तरतूद विचारात घेऊन शक्यतो एकरकमी संस्थेस अनुदान म्हणून देण्यात यावी.

तसेच व्यायाम साहीत्य खरेदीसाठी अट क्र १५ मये नमुद केल्या प्रमाणे संस्थेच्या हिस्सा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडे जमा करणे आवश्यक राहील.

(आ) विशेष घटक योजनेसाठी शासनाने घोषित केलेल्या दलित वस्तीच्या गावातील आणि आदर्श गावातील तसेच शासनाने घोषित केलेल्या आदिवासी भागातील पात्र संस्थांना अंदाजीत खर्चाच्या ९० टक्के किंवा जास्तीत जास्त रू.७.०० लाख यापैकी कमी असेल इतकी रक्कम शक्यतो एकरकमी अनुदान म्हणून मंजूर करावी.

(इ) शासकीय विभाग, शासनामार्फत होणारी क्रीडा संकुले, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय आदिवासी आश्रमशाळा/वसतिगृहे या संस्थांना अंदाजीत खर्चाच्या १०० टक्के किंवा जास्तीत जास्त रू.७.०० लाख इतके अनुदान मंजूर करण्यात येईल. या विभागांना स्वहिश्श्याची रक्कम भरणे आवश्यक राहणार नाही.

**नियम क्र. ७ अनुदानासाठी अर्ज करण्याची पध्दत :-**

अनुदान मंजुरीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज खालील कागदपत्रांसह संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक राहील.

अ) नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

ब) जागेच्या मालकी हक्क पुराव्यासाठी ७/१२ चा उतारा.

किंवा

३० वर्षे दीर्घ मुदतीच्या करारावर असलेल्या जागेबाबत पुरावा दर्शविणारे नोंदणीकृत कागदपत्र.

किंवा

नोंदणीकृत बक्षीसपत्र, दानपत्र,

क) शासकीय अनुदान घेण्याविषयी व्यायामशाळेच्या बांधकामावर अनुदानाव्यतिरिक्त होणारा खर्च करण्याचा संस्थेच्या कार्यकारिणीच्या ठरावाची सत्यप्रत व हमीपत्र.

ड) नियम क्रमांक ४ मधील नमूद केलेल्या व्यायामशाळेच्या बांधकामात ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका, यांची परवानगी असल्याचे प्रमाणपत्र तसेच बांधकामाच्या खर्चाचे अंदाजपत्रक व आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागातील उपअभियंता किंवा नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषदेतील सक्षम अभियंता यांनी मान्य केलेले असावे.

इ) बांधकामासाठी अनुदान मंजूर झाल्यापासून दोन वर्षात व्यायामशाळा बांधकाम पूर्णत्वाचा दाखला (सक्षम अभियंत्याने प्रमाणित केलेला) संचालनालयात सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा मंजूर अनुदान सव्याज वसूल करण्यात येईल.

**नियम क्र ८ अनुदान मंजुरीचे तसेच आहरण व संवितरण अधिकार**

उपरोक्त नियमांच्या अधिन राहून अनुदान मंजूर करण्याचे अधिकार संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना प्रदान करण्यात येत असून आहरण व संविरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

**नियम क्र ९ नियमात बदल/शिथिल करण्याचे अधिकार**

सदर नियमात अंशत: / पूर्णत: बदल किंवा नियम शिथील करण्याचे अधिकार मंत्रालयीन प्रशासकीय विभागास राहतील.

------****-----